**श्री. अ. अ. बाबर, न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) यांचे न्यायालय,**
**बेलापूर, नवी मुंबई.**

**गुन्हयाचा तपशिल**

संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक. १८७३३/२०२६ निशाणी—३
सरकार —वि.— प्रफुल संतोष शिंदे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | ०४/०५/२०२६ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | ०४/०५/२०२६ |
| ३. | फिर्यादीचे संपुर्ण नाव व पत्ता | : | **महाराष्ट्र सरकार मार्फत**<br>पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन<br>वाशी, नवी मुंबई. |
| ४. | आरोपीचे संपुर्ण नाव व पत्ता | : | १) प्रफुल संतोष शिंदे वय — २२वर्षे, धंदा — खादय पदार्थ विक्री राहणार :— सेक्टर ११ कबीर भोईर निवास यांची बिल्डींग चौथा माळा एच.पी. गॅस एजन्सी जवळ वाशी नवी मुंबई . |
| ५. | (अ) अपराधाचा तपशिल | : | |

तुम्ही दिनांक ०४/०५/२०२६ रोजी ००:३० वाजताचे दरम्यान सेक्टर नंबर ३१ एम.पी. भवन समोर वाशी नवी मुंबई येथे रस्त्यावर ॲम्बेसेटर कार क्रमांक के.ए/१९/एन/१४६५ च्या डिकीत दगडी कोळशांचे भटटीची आग बनवून त्यात मोमोज व इतर खादय पदार्थ विक्री करून सर्व सामान्य लोकांच्या जिवीतास धोका करून असे हयगईचे कृत्य करीत असतांना मिळून आलात व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिताचे कलम २८७ नुसार गून्हा केला आहे.

वरील गून्हयासंबंधी तपशील आरोपीला मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

सही/—
( श्री. ए. ए. बाबर )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०३, बेलापूर, नवी मुंबई.

बेलापूर
दिनांक : २०/०८/२०२६

**आरोपीचा जवाब/म्हणणे**

प्रश्न १ : तुम्हाला पोलीसांनी दाखल केलेल्या खटल्याच्या प्रती मिळाल्या काय?

उत्तर : होय.

प्रश्न २ : तुम्हाला गून्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगितला तो तुम्हाला समजला काय?

उत्तर : होय.

प्रश्न ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : मला गुन्हा कबूल आहे.

...............................
आरोपीची सही/अंगठा.

आरोपीस विचारणा केली असता आरोपीने स्वत: होवून व स्वईच्छेने गुन्हा कबुल करीत असल्याचे सांगितले. त्याबाबत आरोपीने पुर्सीस दाखल केली. आरोपी स्वत: होवून गुन्हा कबुल करीत असल्याचे दिसुन आल्यामुळे आरोपीची कबुली स्विकृत करण्यात येते.

सही/—
( श्री. ए. ए. बाबर )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०३, बेलापूर, नवी मुंबई.

बेलापूर
दिनांक : २०/०८/२०२६

.

**न्यायनिर्णय**

**(दिनांक २०/०८/२०२६ रोजी घोषित)**

१. वाशी पोलीस ठाणे यांनी गु.रजि.नं. २०३/२०२६ भारतीय न्याय संहिताचे कलम २८७ अन्वये आरोपीवर गुन्हा दाखल करून मा. न्यायालयात हजर केले आहे. सदरचा गुन्हा आरोपीस कबूल आहे. आरोपी कोणत्याही दाबावाखाली सदर गुन्हयाची कबूली देत नाही असे मान्य करत आहे. सदरच्या गुन्हयाची कबूली तो स्वइच्छेने देत आहे.

२. आरोपीने मा. न्यायालयास विनंती केली आहे की, तो त्याच्या कुटूंबाचा एकमेव कर्ता पुरुष असल्याने त्याला दया दाखविण्यात यावी व कमीत कमी दंडाची शिक्षा करण्यात यावी. तरी सदर गुन्हयाचे स्वरूप व आरोपीची विनंती पाहता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे:

**: आदेश :**

१. आरोपीस भारतीय नागरीक संहिता कलम २७५ नुसार शिक्षा देण्यात येत आहे. आरोपीस भारतीय न्याय संहिताचे कलम २८७ नुसार सदर न्यायालय उठेपर्यंत व रूपये १,०००/— (रुपये एक हजार फक्त) दंडाची शिक्षा करण्यात येते. दंड न भरल्यास आरोपीस ५ दिवसांची साधी कैद ही शिक्षा देण्यात येत आहे.

२. आरोपीने वरील सर्व शिक्षा एकत्ररित्या भोगावी.

३. सदर न्यायानिर्णयाची प्रत विनामुल्य आरोपीस देण्यात यावी.

सही/—

( श्री. ए. ए. बाबर )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०३, बेलापूर, नवी मुंबई.

बेलापूर
दिनांक : २०/०८/२०२६